वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि.०३ एप्रिल २०२५ पाने ४ किंमत ३

# वक्फ : एनडीए-इंडियात खडाजंगी

## केंद्र:वक्फ बोर्डात गैरमुस्लीम नसतील;विरोधकांचा घर दुकाने,जमिनी हडपण्याचा कट

## विधायक संमत झाल्यामुळे देशभरात आंदोलने; मुस्लीम पर्सनला बोर्ड कोर्टात आवाहन देणार

### वक्फला करता येणार नाही संपत्तीवर सहज दावा

### अमित शहा यांनी थेट बीडचे नाव घेत बीडच्या कंकालेश्वर मंदीराची जमिन वक्फ बोर्डाने जबरदस्तीने ताब्यात घेतली

### बीडमध्ये येवून दादांनी रमजान ईदच्या गोड शिरखुर्म्याची शुभेच्छा दिली आणि दुसऱ्याकडे पाठीत खंजर खुपसला




दिव्य वार्ता




दिल्ली । वृत्तसंस्था

लोकसभेमध्ये बुधवारी(ता.२ एप्रिल) वक्फ सुधारणा विधेयक सादर करण्यात आलं.संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेत वक्फ संशोधन विधेयक सादर केल्यानंतर सत्ताधारी –विरोधकांमध्ये दुपारी १२ वाजल्यापासून ते मध्यरात्रीपर्यंत झालेल्या चर्चेनंतर मध्यरात्री या विधेयकावर मतदान पार पडलं. या मतदानानंतर अखेर लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक बहुमतानं मंजूर करण्यात आलं. लोकसभेमध्ये बुधवारी वक्फ दुरुस्ती विधेयक सादर करण्यात आलं. या विधेयकावर मध्यरात्री उशिरा मतदान पार पडलं. मात्र, हे विधेयक स्वबळावर पास करण्याएवढं संख्याबळ एकट्या भाजपकडं नव्हतं. लोकसभेमध्ये भाजपकडे २४० सदस्य आहेत. तर, विधेयक मंजूर होण्यासाठी २७२ सदस्यांच्या पाठिंब्याची आवश्यकता होती. त्यामुळे स्वबळावर भाजपकडे हे विधेयक पास करण्यासाठी बहुमताचा आकडा नव्हता. पण एनडीएतील घटक पक्षांच्या साहाय्यानं वक्फ दुरूस्ती विधेयक अखेर मध्यरात्री झालेल्या मतदानानंतर लोकसभेत मंजूर झाले. यावेळी विधेयकाच्या बाजूने २८८ मते पडली. तर, विरोधात २३२ मते पडली. महत्त्वाची बाब म्हणजे वक्फ दुरूस्ती विधेयकासाठी एकीकडे मतदान होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मात्र सभागृहात उपस्थित नसल्याचं दिसून आलं. एवढं महत्त्वाचं बिल पास होत असताना मोदींनाच दांडी मारल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

वक्फ विधेयकामागील सरकारचा हेतू चांगला नाही; कारण तुमची उक्ती व कृती यात मोठा फरक आहे. आज तुम्ही वक्फ बोर्डात गैर-मुस्लिम सदस्यांना आणत आहात. उद्या तुम्ही मंदिरांच्या मंडळात गैर-हिंदूला आणा.
– अरविंद सावंत, खासदार शिवसेना (ठाकरे गट)

उबाठा पक्षाचे सदस्य कोणाच्या विचारसरणीचे पालन करीत आहेत आणि ते विधेयकाला का विरोध करीत आहेत हे स्पष्ट झाले. या पक्षाला आज हिंदुत्वाची व हिंदूंचीही ॲलर्जी झाली आहे.
– डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार, शिवसेना

वक्फ मंडळांच्या सशक्तीकरणाच्या नावाखाली त्यांच्या आज जे वक्फबाबत घडत आहे ते उद्या अन्य अल्पसंख्याकांबाबतही घडेल.
– नीलेश लंके, खासदार, राष्ट्रवादी काँग्रेस (शप)






देशहित सर्वोपरि - NDA

वक्फ बिल के समर्थन में कौन-कौन ?

| पार्टी | लोकसभा सांसदों की संख्या |
|---|---|
| बीजेपी | 240 |
| टीडीपी | 16 |
| जेडीयू | 12 |
| शिवसेना | 07 |
| एलजेपी (आर) | 05 |
| जेडीएस | 02 |
| जनसेना | 02 |
| आरएलडी | 02 |
| अन्य | 07 |
| कुल आंकड़ा | 293 |

देशविरोध सर्वोपरि - INDI अलायंस

वक्फ बिल के विरोध में कौन-कौन?

| पार्टी | लोकसभा सांसदों की संख्या |
|---|---|
| कांग्रेस | 99 |
| समाजवादी पार्टी | 37 |
| टीएमसी | 28 |
| डीएमके | 22 |
| शिवसेना (यूबीटी) | 09 |
| लेफ्ट | 08 |
| एनसीपी (शरद पवार) | 08 |
| आरजेडी | 04 |
| आम आदमी पार्टी | 03 |
| जेएमएम | 03 |
| आईयूएमएल | 03 |
| नेशनल कॉन्फ्रेंस | 02 |
| अन्य | 10 |
| कुल | 236 |

मुस्लिम संघटनाही विरोधात वक्फ (दुरुस्ती) विधेयकास अन्य अनेक मुस्लिम संघटनांनी विरोध केला आहे. 'या विधेयकाबाबत वाटत असणारी चिंता मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड व अन्य संघटनांनी संयुक्त संसदीय समितीकडे व्यक्त केली होती. परंतु त्याची दखल घेतली गेली नाही,' असा दावा मौलाना खालिद राशी फरंगी महाली यांनी केला. 'हे विधेयक कोणत्याही स्थितीत स्वीकारले जाणार नाही,' अशी भूमिका बरेलीस्थित इत्तिहाद ए मिल्लत कौन्सिलचे प्रमुख मौलाना ताकीर रझा यांनी मांडली.

**काश्मिरमध्ये निषेध**

काश्मीरमधील काही राजकीय पक्षांनीही या दुरुस्ती विधेयकाचा निषेध केला आहे. 'मुस्लिमांची ताकद कमी करण्याच्या दृष्टीने या विधेयकाची रचना करण्यात आली आहे. गेल्या १०-११ वर्षांत मुस्लिमांचे झुंडबळी, मशिदी पाडल्या जाणे आपण पाहिले आहे. त्यामुळे आता सर्वसामान्य हिंदूंनीच याविरोधात पुढे यायला हवे. हा देश गांधींचा आहे, तो राज्यघटनेनुसारच चालायला हवा,' अशी प्रतिक्रिया माजी मुख्यमंत्री व पीडीपीच्या नेत्या मेहबूबा मुफ्ती यांनी दिली. 'या विधेयकात केवळ एकाच धर्माला लक्ष्य करण्यात आल्याने आमचा पक्ष या विधेयकास पाठिंबा देणार नाही,' असे जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी म्हटले. पीपल्स कॉन्फरन्सचे अध्यक्ष साजद गनी लोण यांनीही या विधेयकास विरोध दर्शवला.

**विधेयक मागे घ्या : स्टॅलिन**

'वक्फ (दुरुस्ती) विधेयक मागे घ्या,' अशी मागणी तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी पंतप्रधान मोदी यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे. 'राज्यघटनेने सर्व धर्मांना आपापल्या धर्माचे अनुसरण करण्याचा अधिकार दिला आहे व या अधिकारांचे पालन करणे ही निवडून **आलेल्या सरकारची जबाबदारी** आहे,' असे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. 'अल्पसंख्याकांना असणाऱ्या घटनात्मक सुरक्षेचा या दुरुस्ती विधेयकात विचार करण्यात आलेला नाही. हे विधेयक मुस्लिमांसाठी हानिकारक असल्याने ते मागे घ्यावे,' असे स्टॅलिन यांनी नमूद केले.

## विधेयकाची प्रमुख वैशिष्ट्ये

वक्फ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरकारी मालमत्ता भविष्यात 'वक्फ' सहणार नाहीत.

बोर्डाला वक्फ निश्चित करण्याचा अधिकार राहणार नाही. जिल्हाधिकारी सारे वाद सोडवतील.

संबंधित राज्यांच्या महसूल कायद्यांनुसार सर्वेक्षण करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत.

केंद्रीय वक्फ परिषद : दोन मुस्लिमेतर असतील. खासदार, माजी न्यायाधीश आणि प्रतिष्ठित व्यक्ती मुस्लिम असण्याची गरज नाही. दोन महिला सदस्य असणे आवश्यक आहे.

मुस्लिम संघटनांचे प्रतिनिधी, इस्लामिक कायद्याचे विद्वान, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष हे मुस्लिम असतील.

## जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार कमी होणार

आता जिल्हाधिकाऱ्याऐवजी वरिष्ठ अधिकाऱ्याला संपत्तीच्या मालकीचा निर्णय घेण्याचा अधिकार दिला जाणार. हा अधिकारी राज्य सरकारतर्फे नियुक्त केला जाईल. वक्फकडे किती स्थावर व जंगम संपत्ती आहे? वक्फ सेट्स मॅनेजमेंट सिस्टिम ऑफ इंडियानुसार वक्फच्या नावावर ८,७२,८०४ स्थावर संपत्ती नोंदणीकृत आहेत. तर १६,७१६ जंगम मालमत्ता इतक्या आहेत.

## केंद्राचे अधिकार वाढणार

वक्फच्या नोंदणी, खाते व्यवस्थापन व लेखापरीक्षणासंबंधी नियमात केंद्र सरकार बदल करू शकते. कॅग किंवा इतर नियुक्त अधिकाऱ्यामार्फत वक्फच्या हिशोबांचे लेखापरीक्षण करता येईल. विधेयकानुसार बोहरा आणि आगाखानी मुस्लीम समाजासाठी स्वतंत्र वक्फ बोर्ड तयार करण्यास परवानगी दिली जाईल.

## वक्फ ट्रायब्युलनच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देता येणार

वक्फ ट्रायब्युलनच्या निर्णयाला दिवाणी न्यायालय, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येईल. वक्फ ट्रायब्युनलच्या निर्णयाविरोधात ९० दिवसांच्या आत उच्च न्यायालयात अपील करता येईल, अशी तरतूद वक्फ सुधारणा विधेयकात आहे. वक्फकडून कोणत्याही जमिनीवर सहज दावा करता येणार नाही. केवळ दान म्हणून मिळालेल्या जमिनीच वक्फच्या संपत्तीत समाविष्ट होतील. वक्फच्या सर्व संपत्तीची नोंद एका पोर्टलवर केली जाणार आहे. सरकारी जमिनींवरील दाव्यांची चौकशी केली जाईल. केवळ एखादी जागा नमाजासाठी वापरली जात आहे म्हणून तिथे वक्फचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.


## रचनेत होणार बदल

वक्फ ट्रायब्युनलमध्ये ३ सदस्य असतील. एक सदस्य मुस्लीम कायद्याचा जाणकार असेल. या ट्रायब्युनलचे अध्यक्षपद सेवानिवृत्त किंवा विद्यमान जिल्हा न्यायाधीशांकडे असेल. तिसरा सदस्य हा राज्य सरकारमधील सहसचिव दर्जाचा अधिकारी असेल.

## वक्फ कौन्सिलमध्ये बदल


यामध्ये किमान २ सदस्य बिगरमुस्लीम असतील.
नियुक्त केलेले खासदार, माजी न्यायाधीश आणि इतर मान्यवर मुस्लीम असणे गरजेचे नाही.
मुस्लीम सदस्यांमध्ये २ महिला असणे आवश्यक.















केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी (२ एप्रिल) लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयक सादर केलं. या सुधारित विधेयकावर प्रदीर्घ चर्चा झाली आणि ते मंजूर झालं.

या विधेयकाच्या बाजूने २८८ तर विरोधात २३२ मतं मिळाली. त्यामुळे हे विधेयक मंजूर झालं. आता ते राज्यसभेत मांडलं जाईल.

विरोधी इंडिया आघाडीनं एक दिवस आधी म्हणजे मंगळवारी (१ एप्रिल) बैठक घेत एकत्रितपणे या विधेयकाला विरोध करण्याचा निर्णय घेतला.

तर भाजपानं मंगळवारी (१ एप्रिल) लोकसभेतील त्यांच्या खासदारांना व्हिप जारी करत बुधवारी (२ एप्रिल) सर्व खासदारांना लोकसभेत उपस्थित राहण्याच्या सूचना केल्या होत्या. भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडी आणि विरोधी पक्षांची इंडिया आघाडी यांच्यात या विधेयकावरून एकमत नव्हतं. त्यामुळे संसदेत बहुमताच्या आधारे या विधेयकाचं भवितव्य ठरणार होतं.

वक्फ सुधारणा विधेयकाबाबतच्या चर्चेशी संबंधित १० महत्त्वाचे मुद्दे जाणून घेऊया.

१. लोकसभा आणि राज्यसभेतील संख्याबळ सध्या लोकसभेत एनडीएच्या खासदारांची संख्या २९३ आहे. ५४२ खासदारांच्या सभागृहात आवश्यक असलेल्या बहुमतापेक्षा ही संख्या जास्त आहे.

लोकसभेत बहुमतासाठी २७२ खासदारांची आवश्यकता आहे. तर इंडिया आघाडीचे लोकसभेत २३४ खासदार आहेत.

२. या विधेयकाला कोणाचा पाठिंबा आहे?

भाजपाच्या नेतृत्वाखालील केंद्रातील एनडीए सरकारनं वक्फ सुधारणा विधेयक आणलं आहे. नीतीश कुमार यांचा जेडीयू आणि चंद्राबाबू नायडू यांचा टीडीपी हे देखील एनडीएचे घटक पक्ष आहेत. या दोन्ही पक्षांनी विधेयकाला पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे.

वक्फ दुरुस्ती विधेयकाविरोधात मुस्लिम संघटना आणि विरोधी पक्षांनी विरोध दर्शवलाय. एनडीएमधील शिवसेना (एकनाथ शिंदे गट) आणि लोक जनशक्ती पार्टीनं (राम विलास) देखील त्यांच्या खासदारांना दोन आणि तीन एप्रिलला संसदेत उपस्थित राहण्याचा आणि सरकारला पाठिंबा देण्याचा व्हिप जारी केला आहे.


३. टीडीपीचा पाठिंबा, मात्र...

'इकॉनॉमिक टाइम्स' या आर्थिक विषयांशी निगडीत वृत्तपत्रानुसार, टीडीपीनं वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे. मात्र, टीडीपीचे खासदार लोकसभेत या विधेयकात काही बदल करण्याचा प्रस्ताव देणार आहेत.

याशिवाय टीडीपीनं सरकारला हे विधेयक मागील कालावधीपासून लागू न करण्याचं आवाहन केलं आहे. गेल्या वर्षी नऊ जूनला दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी समारंभामध्ये नीतीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू जेडीयूनं देखील या विधेयकाला पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे. लोकसभेत टीडीपीचे १६ आणि जेडीयूचे १२ खासदार आहेत. तर भाजपाचे २४० खासदार आहेत. वक्फ सुधारणा विधेयक मंजूर होण्यासाठी भाजपाला या दोन्ही पक्षांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. मात्र, या दोन्ही पक्षांचे अल्पसंख्यांक मुस्लीम मतदार आहेत. त्यामुळे या विधेयकाला पाठिंबा दिल्यामुळे मुस्लीम मतदार दुरावले जाण्याच्या शंकेमुळे दोन्ही पक्ष त्याबाबत सावधगिरी बाळगत आहेत.

४. ओवैसी यांचं नायडू आणि नीतीश कुमारांना आवाहन

एआयएमआयएमचे नेते आणि हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवैसी सुरुवातीपासूनच वक्फ सुधारणा विधेयकाविरोधात भूमिका मांडत आले आहेत. ते एनडीएच्या घटक पक्षांच्या नेत्यांनादेखील या विधेयकाला विरोध करण्याचं आवाहन करत आले आहेत. मंगळवारी (१ एप्रिल) ते म्हणाले, जर चंद्राबाबू नायडू, नीतीश कुमार, चिराग पासवान आणि जयंत चौधरी यांनी या विधेयकाला पाठिंबा दिला तर त्यामागं त्यांची राजकीय कारणं असतील. मात्र, पाच वर्षांनी जेव्हा तुम्ही लोकांसमोर जाल, तेव्हा काय उत्तर द्याल?



नवी दिल्ली : मध्यरात्री लोकसभेत जवळपास १० तासांच्या चर्चेनंतर वक्फ बोर्ड कायदा दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात आले. यावेळी विरोधी आणि सत्ताधारी बाकांवरून विरोध आणि समर्थन करणारी भाषणे झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विधेयकाच्या बाजूने भाषणात बीडचा उल्लेख केला. बीड जिल्ह्यातील देवस्थानाची जागा वक्फ बोर्डाने हडप केल्याचा दावा त्यांनी केला.

अमित शाह यांनी बीडचा उल्लेख करत काय म्हटले?

अमित शाह वक्फ विधेयकावरील चर्चेदरम्यान विरोधकांवर टीकास्त्र सोडताना कायद्यातील दुरुस्तीचे जोरदार समर्थन केले. अमित शाह यांनी आपल्या भाषणात म्हटले की, बीडच्या कनकालेश्वर मंदिराची १२ एकर जागा वक्फ बोर्डाने हडपली. प्राप्त माहितीनुसार, १९५१ मध्ये मंदिर ट्रस्टने ५५ एकर जागा घेतली. २०१७ मध्ये १२ एकर विकली. पण या जागेवर वक्फने दावा केला. वक्फ बोर्डाच्या महाराष्ट्रात ३१,२१६ मालमत्ता असल्याचे केंद्राने संसदेत सांगितले. मात्र, वक्फ बोर्डाच्या संकेतस्थळावर मात्र अजूनही २३,५६६ मालमत्तांचीच नोंद आहे. यात सर्वाधिक मराठवाड्यात १५,८७७ मालमत्ता असून ही जागा २३,१२१.१० हेक्टरवर आहे. यापैकी ६० टक्के जागांवर अतिक्रमण असल्याचे त्यांनी म्हटले. शाहांनी पुढे म्हटले की, राज्यातील जागा ताब्यात घेण्यासाठी वक्फ बोर्डाने ४२ आदेश काढले, पण एकही जागा ताब्यात घेण्यात यश आले नाही. मराठवाड्यामध्ये १०८८ प्रकरणांत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आदेश दिले. मात्र, ३० जून २००७ पर्यंत फक्त २१ आदेशांची अंमलबजावणी झाली.

# मध्यरात्री झालेल्या मतदानानंतर अखेर लोकसभेत 'वक्फ दुरूस्ती विधेयक' मंजूर

६. एनडीए आणि इंडिया आघाडीत नसणाऱ्या पक्षांचा कल कोणाकडे?

संसदेत असे काही छोटे पक्ष आणि अपक्ष खासदार आहेत, ज्यांनी उघडपणे वक्फ सुधारणा विधेयकाला विरोध केला आहे.

यामध्ये एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी आणि बिहारमधील पूर्णियाचे खासदार पप्पू यादव यांचा समावेश आहे.

केंद्रीय मंत्री किरन रिजिजू यांनी लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयक २०२५ सादर केलं.

२२ मार्चला ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डानं (एआयएमपीएलबी) जंतर-मंतरवर वक्फ सुधारणा विधेयकाविरोधात निदर्शनं केली होती. त्यात पप्पू यादवदेखील सहभागी झाले होते. सभागृहात हा मुद्दा मांडण्याचं आश्वासन त्यांनी दिलं होतं.

७. सात अपक्ष खासदार काय करणार?

लोकसभेत सात अपक्ष खासदार आहेत. त्यामध्ये पूर्णियाचे खासदार राजेश रंजन उर्फ पप्पू यादव यांचाही समावेश आहे. पप्पू यादव यांनी यापूर्वी केलेल्या वक्तव्यांकडे पाहिलं तर हे उघड आहे की ते वक्फ सुधारणा विधेयकाला विरोध करतील.

तर महाराष्ट्रातील सांगलीचे खासदार विशाल प्रकाशबाबू पाटील अपक्ष आहेत. मात्र, ते काँग्रेसकडून लोकसभा निवडणुकीत तिकिट न मिळाल्यामुळे अपक्ष म्हणून उभे राहिले होते. ते काँग्रेसबरोबरच जाण्याची शक्यता आहे. मात्र, आतापर्यंत त्यांनी यासंदर्भात कोणतंही स्पष्ट वक्तव्य केलेलं नाही.

खालिस्तानसमर्थक अमृतपाल सिंह पंजाबमधील खडूर साहिबचे अपक्ष खासदार आहेत, मात्र आसामच्या तुरुंगात असल्यामुळे आतापर्यंत त्यांनी खासदारकीची शपथ घेतलेली नाही

फोटो कॅप्शन, खालिस्तानसमर्थक अमृतपाल सिंह पंजाबमधील खडूर साहिबचे अपक्ष खासदार आहेत, मात्र आसामच्या तुरुंगात असल्यामुळे आतापर्यंत त्यांनी खासदारकीची शपथ घेतलेली नाही

अमृतपाल सिंह पंजाबमधील खडूर साहिबचे खासदार आहेत आणि ते खलिस्तानसमर्थक आहेत. मात्र राष्ट्रीय सुरक्षा कायद्याअंतर्गत अटक झाल्यानंतर सध्या ते दिब्रूगड तुरुंगात आहेत.

जम्मू काश्मीरमधील बारामुल्लाचे खासदार अब्दुल रशीद शेखदेखील तुरुंगात आहेत. ते कदाचित मतदानात सहभागी होऊ शकणार नाहीत. याशिवाय पंजाबमधील फरीदकोटचे खासदार सरबजीत सिंह खालसा, दमन व दीव (केंद्र शासित प्रदेश) चे खासदार उमेश भाई बाबूभाई आणि लडाखचे खासदार मोहम्मद हनीफादेखील अपक्ष आहेत.

८. कोणाच्याही बाजूनं नसणारे पक्ष

तीन असे राजकीय पक्ष आहेत, ज्यांना त्यांच्या राज्यात जनाधार आहे. मात्र, ते केंद्रामध्ये कोणत्याही आघाडीचा भाग नाहीत. यामध्ये मायावती यांची बहुजन समाज पार्टी, नवीन पटनायक यांचा बिजू जनता दल यांचा समावेश आहे. अर्थात या दोन्ही पक्षांचा लोकसभेत सध्या एकही खासदार नाही.

आंध्र प्रदेशात जगन रेड्डी यांच्या वायएसआरसीपीचे चार खासदार आहेत. हा पक्षदेखील कोणत्याही आघाडीचा भाग नाही. आझाद समाज पार्टी (कांशीराम)चे चंद्रशेखर आझाद हे एकच खासदार आहेत. उत्तर प्रदेशातील नगीनामधून ते निवडून आले आहेत. चंद्रशेखर आजाद, हे आजाद समाज पार्टीचे (कांशीराम) एकमेव खासदार आहेत हरसिमरत कौर, या एनडीएमधून वेगळे झालेल्या पंजाबमधील शिरोमणि अकाली दलाच्या (शिअद) एकमेव खासदार आहेत. राजकुमार रोत हे भारत आदिवासी पार्टीचे एकमेव खासदार आहेत. काँग्रेसच्या पाठिंब्यावर ते राजस्थानातील बांसवाडामधून निवडून आले आहेत.

रिचर्ड वनलाल्हमांगैहा, मिझोरमच्या जोरम पीपल्स मूव्हमेंट (झेडपीएम)चे खासदार आहेत. तर डॉ. रिकी अँड्र्यू जे सिंगकॉन हे मेघालयमधील वॉईस ऑफ द पीपल पार्टीचे एकमेव खासदार आहेत.

९. ऑगस्ट २०२४ मध्ये सादर झालं विधेयक वक्फ सुधारणा विधेयक गेल्यावर्षी म्हणजे, ऑगस्ट २०२४ मध्ये सादर करण्यात आलं होतं. त्यानंतर हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं होतं.

चर्चेच्या अनेक फेऱ्यानंतर या समितीनं अहवाल सादर केला होता.

१०. कोणत्या मुद्द्यांना आहे विरोध?

वक्फ सुधारणा विधेयकाच्या बाबतीत सर्वाधिक विरोध आहे, तो सेंट्रल वक्फ कौन्सिल आणि वक्फ बोर्डामध्ये बिगर मुस्लिम सदस्यांचा समावेश करण्यास.

याशिवाय सरकारच्या ताब्यात असणाऱ्या वक्फ बोर्डाच्या मालमत्तेच्या दाव्यावर जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल आणि त्यांच्या अहवालाच्या आधारे ती मालमत्ता सरकार ताब्यात घेऊ शकतं.

या विधेयकात वक्फ बोर्डाचा सर्व्हेचा अधिकार देखील जिल्हाधिकाऱ्याला देण्यात आला आहे. प्रस्तावित विधेयकात सेंट्रल वक्फ कौन्सिलमध्ये बिगर-मुस्लिम सदस्य आणि दोन महिला सदस्य असणं बंधनकारक करण्यात आलं आहे. त्याचबरोबर शिया आणि सुन्नी यांच्याव्यतिरिक्त बोहरा आणि आगाखानींसाठी स्वतंत्र बोर्ड स्थापन करण्याचा मुद्दादेखील प्रस्तावित आहे.

वक्फ सुधारणा विधेयकाला

ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड (एआयएमपीएलबी) ही मुस्लीम समुदायाची देशातील सर्वात मोठी संघटना न्यायालयात आव्हान देणार आहे. तसेच या काळ्या कायद्याच्या विरोधात रस्त्यावर उतरून लढा दिला जाईल असेही या संघटनेने जाहीर केले आहे. एआयएमपीएलबीचे सदस्य मोहम्मद अदीब यांनी सांगितले की, मुस्लिम समुदायाची मालमत्ता हडप करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. आम्ही ही चाल कधीही यशस्वी होऊ देणार नाही. वक्फ विधेयकाबाबतचा लढा आम्ही हरलो आहोत असे कोणीही समजू नये. आमच्या संघर्षाला आता सुरूवात झाली आहे. देश वाचविण्यासाठी आम्ही हा लढा देत आहोत. वक्फ सुधारणा कायदा हा भारताच्या एकात्मतेवर घाला आहे, असेही अदीब म्हणाले. उत्तर प्रदेशात कडक सुरक्षा व्यवस्था वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत बुधवारी सादर झाल्याच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातील अनेक शहरांतील संवेदनशील आणि अतिसंवेदनशील भागांत सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली. वरिष्ठ पोलिस अधीक्षकांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी ध्वजसंचलन केले. मुस्लीम संघटनांचा विधेयकाला विरोध आहे.

विधेयक मागे घ्या; एम.के.

स्टॅलिन यांची मागणी वक्फ सुधारणा विधेयक मागे घ्यावे अशी मागणी तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली. प्रत्येक नागरिकाला त्याच्या धर्माचे पालन करण्याचा अधिकार राज्यघटनेने दिला आहे, असे स्टॅलिन यांनी म्हटले आहे.

विधेयकाला विरोधच

ओडिशातील विरोधी पक्ष असलेल्या बिजू जनता दलाने (बिजद) लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयकालाच विरोध केला. आंध्र प्रदेशातील वायएसआरसीपी पक्षाचे नेते एम. गुरुमूर्ती यांनी सांगितले की, आमच्या पक्षाने लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयकाला विरोध दर्शविला आहे. माकपनेही विरोध केला आहे.

# जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राच्या शिष्टमंडळाने स्फोटग्रस्त मशिदीला भेट दिली

## ताब्यात घेतलेले आरोपी कोणत्याही परिस्थितीत सुटू नये याची पोलिसांनी दक्षता घ्यावी






बीड । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यातील अर्ध मसाला गावातील मशिदीत करण्यात आलेल्या स्फोटाच्या प्रकरणात, जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्रने २ एप्रिल रोजी अर्ध मसाला गावाला भेट दिली आणि घटनेची माहिती घेतली . जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राचे सचिव अब्दुल मुजीब यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाने मशिदीला भेट दिली आणि मक्का मस्जिद अर्ध मसला येथील इमाम साहेब, मशीद समितीचे लोक, गावचे सरपंच, या प्रकरणातील तक्रारदार आणि स्थानिक रहिवाशांशी चर्चा केली. यासोबतच शिष्टमंडळाने बीड जिल्ह्याचे एसपी नवनीत कांवत यांची भेट घेतली आणि पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेचे कौतुक केले आणि आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी पोलिसांनी त्यांचे प्रयत्न सुरू ठेवण्याचे आवाहन केले. शिष्टमंडळाचे प्रमुख अब्दुल मुजीब यांनी येथे सांगितले की, आम्ही महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की कोणत्याही परिस्थितीत या घटनेतील दोषींना सूट देऊ नये आणि त्यांना कठोर शिक्षा देण्यासाठी अशी व्यवस्था करावी. अब्दुल मुजीब यांनी असेही सांगितले की मशिदीला झालेल्या नुकसानीच्या दुरुस्तीसाठी जो काही खर्च येईल, तो जमात-ए-इस्लामी महाराष्ट्र सहन करण्यास तयार आहे आणि खटला पुढे लढण्यासाठी जी काही कायदेशीर मदत लागेल, ती जमात-ए-इस्लामी हिंद असोसिएशन फॉर प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स (एपीआर) द्वारे ही कायदेशीर मदत देण्यास तयार आहे. ग्रामपंचायत आणि सरपंचांकडून अपेक्षा आहे की ग्रामपंचायतीने असा ठराव घ्यावा की हे दोन्ही गुन्हेगार पुन्हा कधीही या गावात येऊ शकणार नाहीत. या शिष्टमंडळात अब्दुल वाहिद जालना, बीड जिल्हा संघटक सय्यद इफ्तेकार, एपीसीआरचे सय्यद शफीक हाश्मी, डॉ. सिराज आरजू, शेख माजलगाव, शेख मुनिरुद्दीन अंबाजोगाई, शेख शौकत माजलगाव, युनुस खान, सय्यद सबाहत, शेख शौकत, मिर्झा इरफान बेग, इतर सदस्यांमध्ये मोहम्मद फैजान, सय्यद अर्शद, तलवड्याचे उपसरपंच अक्रम सौदागर, नंदपुरचे नवीद पटेल इत्यादींचा समावेश होता. यावेळी जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राच्या शिष्टमंडळाने गावातील रहिवाशांशी बोलून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

# कर्ज भरण्यासाठी बँकेचा तगादा शेतकऱ्याची आत्महत्या

गेवराई ।दिव्य न्युज



कर्ज माफी होणार नाही असे जाहीर केले अन् त्यात बँकेने कर्ज भरण्याचा तगादा लावल्याने आर्थिक विवंचनेत असलेल्या शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गेवराई तालुक्यातील रांजणी येथे घडली आहे. आकाश श्रीराम रोडगे(वय ३६ वर्ष)रा.रांजणी ता.गेवराई असे आत्महत्या केलेल्या तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. मयत शेतकऱ्याने बँक ऑफ महाराष्ट्राकडून पत्नी वैशाली रोडगे यांच्या नावे ७० हजार रुपयाचे कर्ज घेतले होते.कर्ज भरणा करण्यासाठी बँकेकडून तगादा लावल्याने सद्यपरिस्थितीत पैसे नसल्याने शेतकरी आकाश रोडगे हे मागील आठवड्यापासून चिंतेत होते.त्यातच कर्ज माफीची आशा मावळल्याने कर्ज फेडायचे कसे या विवंचनेत असलेल्या आकाश याने मंगळवारी दि. १ एप्रिल रात्री घरातील आडूला गळफास घेऊन आत्महत्या केली. मयताच्या पश्चात पत्नी, एक मुलगा,एक मुलगी, वडील असा परिवार आहे.




आष्टी – सालाबादप्रमाणे आष्टी शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे नॅशनल ऑटोमोबाईलचे संचालक श्री.रज्जाक सय्यद, शाहरुख सय्यद यांच्या तर्फे मोफत पाणपोईचा आज बुधवार दि. २ एप्रिल रोजी शुभारंभ करण्यात आला. यावेळी रज्जाक सय्यद, पत्रकार मुजाहिद सय्यद, अदनान फिटर आदी दिसत आहेत.

# वक़्फ अमेंडमेंट बील विरोधात लोकसेनाचे होणारे आंदोलन स्थगित अजित पवार यांच्या दौऱ्यामुळे पोलिसांनी नाकारली परवानगी –ॲड. प्रा. इलियास इनामदार

बीड । दिव्य न्युज



केंद्रातील भाजपा मोदी सरकार मुस्लिम विरोधी वक़्फ कायदा २०२४ संसदेत आणणार आहे या कायदयाचा विरोध दर्शवन्यासाठी लोक सेना संघटनेच्या वतीने लोकसेना प्रमुख ड. प्रा. इलियास इनामदार यांच्या नेतृत्वाखाली दि.०२/०४/२०२५ रोजी आंदोलन होणार होते व पुढे जिल्हाधिकारी कार्यालय बीडवर बेमुदत उपोषणाला बसणार होते हा आंदोलन उपोषण शांततेत व लोकशाही मार्गाने होणार होता रहदारीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची लोक सेना संघटनेच्या वतीने हमी देण्यात आली होती तरी ही पोलिस प्रशासनाने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीड जिल्हा दौ-यावर येत असल्याने लोक सेना संघटनेला परवानगी दिली नाही पोलिस प्रशासनने एका मंत्रीच्या दौ-यामुळे आम्हाला आमच्या संवैधानिक हक़्कापासुन वंचित ठेवल्याने तमाम मुस्लिम बांधवांच्या भावना दुखावले गेल्यामुळे लोक सेना या घटनेचा जाहिर निषेध करत असुन आजचा होणारा आंदोलन स्थगित केला आहे असे लोकसेना प्रमुख ड. प्रा. इलियास इनामदार यांनी जाहिर करत आहे.

# सेलू येथील नामंकित महाविद्यालयातील १९ वर्षीय विद्यार्थीनी गायब; या महाविद्यालयतील विद्यार्थीनी बेपत्ता होण्याची ही दूसरी घटना!

जिंतूर/ सेलू । दिव्य न्युजः सालेह चाऊस

सेलू शहरातील परभणी रस्तावर असलेल्या एका नामंकित महाविद्यालयाची १९ वर्षीय विद्यार्थीन ०१ एप्रील२०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून या महाविद्यालयात प्रक्टिकल देण्यासाठी गेली होती ती परत न आल्यामुळे घरच्यानी सर्वत्र शोध घेतल्यानंतर सापडली नाही म्हणून बुधवारी दिनाक ०२ एप्रील २०२५ रोजी रात्री ००:३३ वाजता सेलू पोलीस ठाण्यात मिसींग दाखल केली आहे या पूर्वी ही याच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बारावी ची परिक्षा देण्यासाठी गेली असता गायब झाली होती आजची ही दूसरी घटना असल्यामुळे महविद्यालय परिसरामध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# शेख सुलतान यांनी शुन्यातून येत तिन्ही मुलांना केले उच्च शिक्षीत

## मुहम्मदी फार्मसी ऑफिसर, जाफर एम्ब्रीयोलॉजिस्ट,इरम ट्रान्स प्लांट नर्स



बीड । दिव्य न्युज

मूळचे अहेमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात असलेल्या चिचोंडी शिराळ येथील रहिवासी, बीड शहराचे जावई आणि गेल्या ३२ वर्षांपासून औरंगाबाद येथे स्थायिक झालेले शेख सुलतान याक़ूब यांनी अक्षरशः शून्यातून पुढे येत आपल्या तिन्ही मुलांना उच्चशिक्षित केले. यात मोठी मुलगी शेख मुहम्मदी सुलतान (नागपूर) हिने एम. फार्म पर्यंत विशेष प्राविण्याने शिक्षण घेत फार्मसी ऑफिसर पदापर्यंत झेप घेतली. (तिचे इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण बीड शहरातील छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालयात आजोळी झाले). मुलगा शेख ज़ाफ़र सुलतान (गोंदिया) हा एम.एस.सी.सी.इ. पर्यंत शिक्षण घेऊन एम्ब्रीयोलॉजिस्ट (भ्रूण शास्त्रज्ञ) झाला तर लहान मुलगी शेख इरम सुलतान (पुणे) हि पी.बी.एस.सी. पर्यंत चे शिक्षण घेऊन ट्रान्स प्लांट नर्स झाली आहे. या तिघांनीही मेहनत आणि चिकाटी च्या बळावर गरुड झेप घेऊन आई-वडिलांनी त्यांच्यासाठी घेतलेल्या श्रमाचे चीज केले आहे. रमज़ान ईद निमित्ताने हे तिन्ही बहीण-भाऊ औरंगाबाद येथील घरी आले असता त्यांचे पीर ओ मुर्शिद हज़रत सय्यद रौशन मियाँ (हैदराबाद) यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते तिघांचेही अभिनंदन करून सत्कार करण्यात आले. तसेच यापुढेही त्यांनी अनेक यशस्वी शिखरे लिलया पादाक्रांत करावी अशा शुभेच्छा देण्यात आल्या. या तिन्ही भावंडांनी दाखवून दिले की, पालक जागरूक असले आणि जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या बळावर शिक्षणाची कास घट्ट धरली तर परिस्थिती कशीही असो आपल्याला हवे ते साध्य करता येते. यावेळी मुलामुलींचे मामू मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़-शेख कौसर जहाँ (मामू-मुमानी), नईम अहेमद (मामू), शेख फुरखान, शेख वासेख, शेख लईख, मुहम्मद अली यांची उपस्थिती होती.

# वक्फ सुधारणा विधेयकाबाबत अजितदादांच्या राष्ट्रवादीची भूमिका काय? सुनील तटकरे पहिल्यांदाच स्पष्ट बोलले

मुंबई । दिव्य न्यूज

बुधवारी लोकसभेमध्ये वक्फ सुधारणा विधेयक मांडण्यात आलं. हे विधेयक लोकसभेत सादर होताच विरोधकांनी मोठा गोंधळ केल्याचं पाहायला मिळालं. दिवसभर आणि रात्री उशिरापर्यंत या विधेयकावर चर्चा सुरू होती. त्यानंतर मध्यरात्री या विधेयकावर मतदान घेण्यात आलं. विधेयकाच्या बाजुनं २८८ मत पडली तर विधेयकाच्या विरोधात २३२ मतं पडली. हे विधेयक लोकसभेत मंजूर झालं आहे. त्यानंतर आता या विधेयकावर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया समोर येत आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे यांची प्रतिक्रिया देखील समोर आली आहे.

नेमकं काय म्हणाले तटकरे?

आम्ही वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा दिला आहे, मुस्लिम समाजामध्ये विरोधकांकडून जाणीवपूर्वक गैरसमज



निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. राष्ट्रपतींच्या सहीनंतर विधेयकाची अंमलबजावणी होईल. मुस्लिम समाजाला न्याय देणारे हे विधेयक आहे, समाज्याच्या प्रगतीसाठी हे विधेयक आहे. आम्ही पाठिंबा दिला, समर्थन केलं, बोलल्याने समर्थन आहे हे सिद्ध होतं, असं तटकरे यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, इतर पक्षांची भूमिका काय होती, त्याबाबत मी बोलणार नाही. कोंडी कोणाची झाली त्यावरही बोलणार नाही. हे विधेयक धार्मिक नाही, वक्फ बाबत वास्तविकता समोर येण्यासाठी हे विधेयक आहे, असं यावेळी सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान या विधेयकावर चर्चे सुरू असताना लोकसभेत चांगलाच गोंधळ झाला. विधेयक लोकसभेत सादर होताच विरोधकांनी गोंधळ घातला, तर सत्ताधारी देखील या विधेयकाच्या समर्थनार्थ मैदानात उतरल्याचं पाहायला मिळालं. काल दिवसभर या विधेयकावर चर्चा झाली. त्यानंतर मध्यरात्री हे विधेयक लोकसभेत मंजूर झालं. विधेयकाच्या बाजूनं २८८ मतं पडली तर विधेयकाच्या विरोधात २३२ मतं पडली. अखेर हे विधेयक लोकसभेत मंजूर झालं आहे. या विधेयकावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गट आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे.

# बीडच्या उर्दूघरासह, वॉकिंग ट्रॅक, अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न मार्गी लावू-अजितदादा

## फारूक पटेल यांच्या ईद मिलापमधून अजितदादांकडून विकासाचा शब्द

### नफरत को मिटाकर देखों, दिलों को जोडकर देखों सुकून मिलता है बस मोहब्बत को अपनाकर देखों-अजितदादा





### पटेल यांनी कुरआन तर अमरनानांनी श्रीमद् भागवत गीता देऊन केले दादांचे स्वागत



बीड नगर परिषदेचे गटनेते फारुख पटेल यांनी आयोजित केलेल्या ईद मिलाप कार्यक्रमातक महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. नगरसेवक अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक म्हणून आज आदरणीय अजितदादांचा श्रीमद् भगवद्गीता व कुरान शरीफ हे दोन पवित्र ग्रंथ देऊन स्वागत केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पटेल आणि अमर नाईकवाडे या जोडीने हिंदू - मुस्लिम एकतेचे दर्शन घडवले.

बीड । दिव्य न्युज

गेवराई तालुक्यातील अर्धमसला प्रकरणात पालकमंत्री या नात्याने तातडीने संबंधीत अधिकाऱ्यांना संपर्क करून दोषींवर कठोर कारवाईच्या सुचना दिलेल्या आहेत. आपण काळजी करू नका, जे दोषी आहेत त्यांच्यावर नक्कीच कडक कारवाई करण्यात येईल असे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी सांगितले. फारूख पटेल यांनी विकासाचे जे मुद्दे मांडले आहेत या विषयी अधिकाऱ्यांच्या बैठकीत माहिती घेऊन त्या संबंधी योग्य निर्णय घेतला जाईल. बीड शहरातील १७ रस्त्यांच्या कामासह इतरही प्रश्न मार्गी लावू आणि विकासासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन दिला जाईल असा शब्द अजितदादांनी फारूक पटेल आणि उपस्थित मुस्लिम समाजाला दिला.

बीड येथे राष्ट्रवादीचे नेते फारूख पटेल यांनी आयोजीत केलेल्या ईद मिलाप - कार्यक्रम प्रसंगी अजितदादा बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आ. प्रकाशदादा सोळंके, आ. विक्रम काळे, माजी आ.अमरसिंह पंडित, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष सलीम सारंग, मोहन चौधरी, ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, सुरज चव्हाण, नगरसेवक अमर नाईकवाडे, मोईन मास्टर, डॉ. योगेश क्षीरसागर, अश्फाक इनामदार, अविनाश नाईकवाडे, बरकत पठाण, शफीक हाश्मी, मौलाना जाकेर, मौलाना बाकी, अलीम पटेल, शकील खान आदिंची उपस्थिती होती. अजितदादा म्हणाले की, बीड जिल्ह्याला शांती आणि विकासाच्या नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी सर्वांच्या योगदानाची गरज आहे. प्रेम आणि भाईचारा



कायम राखावा. भडकाऊ वक्तव्य आणि अफवांपासून सावध रहावे असे आवाहन त्यांनी केले. नफरत को मिटाकर देखों, दिलों को जोडकर देखों सुकून मिलता है बोहोत, बस मोहब्बत को अपनाकर देखों असे म्हणत त्यांनी जिल्ह्याच्या विकासात सर्वांनी एकत्र येऊन योगदान देण्याचे आवाहन केले. फारूख पटेल यांनी विकासाचे मुद्दे मांडले, त्यात वॉकिंग ट्रॅक, रोड यासह इतर मुद्यांचा समावेश असुन या संदर्भात पालकमंत्री या नात्याने जास्तीत जास्त निधी कसा देता येईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे अजितदादांनी सांगितले. रमजान ईदच्या अनुषंगाने अजितदादांनी सर्व मुस्लिम समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी फारूक पटेल म्हणाले, दरवर्षी ईद मिलाप कार्यक्रम घेतला जातो मात्र यावर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजितदादा यांनी उपस्थित राहून चार चांद लावले आहेत. ईदसाठी मोठे ज्यावेळी घरी येतात त्यावेळी लहानांना ईदी देतात असे म्हणत पटेल यांनी बीड शहराच्या विकासाच्या अनुषंगाने काही मागण्या दादांपुढे मांडल्या. अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न २००६पासून प्रलंबित आहे त्यामुळे प्राधान्याने हा प्रश्न मार्गी लावावा, अल्पसंख्याक बहुल भागात विकास कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, खासबाग मैदानावर वॉकिंग ट्रॅक आणि त्याचा विकास करावा, बीडमध्ये उर्दू घराची निर्मिती करावी, विद्यार्थ्यांसाठीअभ्यासिका यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, बीड शहरातील पाणी पुरवठ्याचा थकीत वीजबिल प्रश्न, राजुरी वेसै ते चांदणी चौक, राजुरी वेस ते माळीवेस, राष्ट्रवादी भवन ते स्मशान भूमी अशा १७ रस्त्यांच्या कामाचा प्रस्ताव आहे त्यास निधीसह मंजुरी द्यावी आणि अतिक्रमण हटवण्यात आलेल्या १४ घरांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा अशा आग्रही मागण्या फारूक पटेल यांनी अजितदादा पुढे मांडल्या.

# शेख निजामच्या मागे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पूर्णपणे ताकतीनिशी पाठीशी राहील-उपमुख्यमंत्री अजित पवार







बीड । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यातील व शहरातील प्रगल्भ आणि अचूक राजकीय निर्णय घेण्याची क्षमता असलेल्या शेख निजाम यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधण्याचा निर्णय घेतला व त्यानिमित्ताने शेख निजाम यांचा पक्षप्रवेश व रमजान ईद निमित्त ईद-ए-मिलाप या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या पक्षप्रवेश व ईद-ए-मिलाप च्या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य श्री अजित दादा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी प्रस्ताविक पर भाषणामध्ये शेख निजाम

### प्रवेश झालेल्या लोकांची नावे

शेख निजाम जैनुद्दीन ,शेख अमर जैनुद्दीन, मोमीन जुबेर ,खय्युम इनामदार, पठाण चुन्नू खान, जयंत वाघ ,आजम खान, जब्बार इनामदार ,मुजफ्फर चौधरी ,शेख, नसीर, हाजी अयुब खान पठाण ,शेख हमीद पीर मोहम्मद ,सय्यद फहीम, शेख इमरान शेख अदनान जमीर इनामदार सय्यद रियाज राजे व इतर

यांनी बीड शहरातील महत्त्वपूर्ण असलेल्या नवीन ईदगाह बालेपिर येथे सिमेंट काँक्रेट रस्ता व काँक्रिटीकरण, अल्पसंख्याक समाजातील मुलींकरिता मंजूर असलेले वस्तीग्रह च काम सुरू करणे, बीड जिल्ह्यात उर्दू घराची स्थापना करणे, इतर जिल्ह्याप्रमाणे बीड जिल्ह्यातील यूपीएसस एमपीएससीची तयारी करणाऱ्या अल्पसंख्यांक मुला मुलीं करिता स्टडी सेंटर व लायब्ररी स्थापित करणे, इस्लामपुरा ईदगाह येथे जागा अपुरी पडत असल्यामुळे बिंदुसरा नदी पात्रातील जागा उपलब्ध करून देणे, अल्पसंख्यांक बहुल भागात नियोजनबद्ध आराखडा तयार करून सदरील भागांचा नियोजनबद्ध विकास करणे आधी मागण्या उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या कडे केल्या या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शेख निजाम हे महत्त्वकांक्षी व्यक्तिमत्व असून त्यांनी केलेल्या मागण्या चा सकारात्मक विचार करून त्या पूर्ण करण्यात येतील त्याचा पाठपुरावा शेख निजाम यांनी करावा व या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन दिले व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याबद्दल एक निजाम व सहकार चे अभिनंदन करीत शेख निजाम सारख्या कार्यकर्त्यांची पक्षाला गरज असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शेख निजाम यांच्या पाठीशी पूर्णपणे ताकतीशी उभी राहील असे म्हटले सदरील कार्यक्रमास मा आ. प्रकाश दादा सोळंके, मा. आ. अमरसिंह जी पंडित, आ. विजयसिंह पंडित, आ. सतीश जी चव्हाण, आ. विक्रम काळे, माजी आ. संजय दौंड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण अँड गोरक्ष लोखंडे, राष्ट्रवादी ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, योगेश क्षीरसागर, नारायण बप्पा शिंदे बळीराम गवते, बळी चव्हाण, प्रशिक्षित जाधव, अनुप मंत्री, संदीप पाटील, रितेश ढगे पाटील गोपाल धांडे, विजय चांदणे, सलीम शेख, समीर सय्यद, रईस चाऊस, सरपंच बिलाल पटेल, प्रज्ञाताई खोसरे, प्रियाताई डोईफोडे, शितलताई धोंडरे,लोकपत्रकार भागवत तावरे, अब्दुल वकील सर अस्लम अनवरी सर, नगरसेवक जैतुला खान, शेख इकबाल, रवीद्र कदम विनोद मुळूक, विलास विधाते, रमेश चव्हाण, सय्यद इलियास मुन्ना, इनामदार, रफिक नाशाद,यांच्या सह बीड शहरातील अनेक नगरसेवक मान्यवर व्यक्ती राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी सर्वसामान्य नागरिक व महिला वर्ग मोठ्या प्रमाणात आदी उपस्थित होते

## दौलावडगाव येथे पवित्र रमजान निमित्त प्रेमभाव आणि सलोखा संदेश






दौलावडगाव/ दिव्य न्युज...

आष्टी तालुक्यातील सुरेश आण्णा धस यांचे कट्टर समर्थक दौलावडगाव गटातील सामाजिक धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातील उभरतं नेतृत्व श्री सतीश तुकाराम कोहोक आणि धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय नाव असलेले श्री गुलाब रामा इथापे यांनी आपल्या मुस्लिम मित्रांसोबत रमजानचा उपवास ठेवून सर्वांसाठी रमजान ईद हा केवळ आनंदाचा सण नसून त्यामागे समर्पण, संयम, दानशूरता आणि मानवतेचा महान संदेश आहे. या पवित्र दिनी आपण एकमेकांप्रती प्रेम, सहकार्य व सद्भावना व्यक्त करूया. या भावनेतून आणि सर्वधर्म समभावाचा अनोखा संदेश देत पवित्र रमजान सनाचे रोजा उपवास करून गावात हिंदू -मुस्लिमामध्ये जातीय सलोखा अबाधित रहावा समभावाचा आणि प्रेमाचा संदेश जावा आणि सर्व समाजातील लोकांनी गुण्यागोविंदाने राहावं.या हेतूने रमजान ईद चे उपवास केले म्हणून दौलावडगाव येथील सर्व मुस्लिम बांधवांनी रमजान ईदच्या दिवशी ईदगाह मैदान येथे या दोघांना बोलवून सर्व समाजाच्या वतीने गुलाब इथापे( मामा )आणि सतीश कोहक यांचा फूलहार शाल देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

## ऑटो रिक्षा- बोलेरो गाडीचा अपघात एक ठार एक जखमी

जिंतूर । दिव्य न्युज

सेलूतालूक्यातील ढेंगळी पिपळगाव- मानवत रोड दरम्यान बजाज अटो रिक्षा व बोलेरो गाडी या वाहनात झालेल्या घपघातात एक ३२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला तर दूसरा ३२ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला आहे.



ही घटना दिनांक ३० मार्च रोजी रविवारी रात्री साडेनऊ वाजता च्या सुमारास घडली आहे सेलू शहरातील सरस्वती कॉलोनी येथील आकाश अरुण आढाव वय ३२ वर्ष व त्याचा मित्र गजानन गणेश पडूळे वय ३२ वर्ष हे दोघे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर परभणी येथील बजाज शो रूम वरून नवीन अटोरिक्षा खरेदी करून परभणीहुन गावाकडे सेलू येथे येत असताना त्यांच्या अटोरिक्षाला एका भरधाव बोलेरो वाहनाने जोरदार धडक दिल्याने आकाश आढाव यांच्या जागीच मृत्यू झाला तर गजानन पडूळे हा गंभीर जखमी झाला होता त्यास उपचारार्थ सेलू येथील उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले होते परंतू त्यास जास्त मार असल्याने सेलूच्या डॉक्टरांनी परभणी येथे रेफर केले आहे ही घटना गुढीपाडण्याच्या सणाच्या दिवशी घडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे

## ओझरला रमजान ईद उत्साहात साजरी मुस्लिम बांधवानी केले सामुहिक नमाज पठण





ओझर । दिव्य न्युज : जुबेर शेख

ओझर, ओझरटाऊनशिपसह परिसरातील मुस्लिम बांधवा तर्फे रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

ईदगाह येथे आज सकाळी ९ वाजता मुस्लिम बांधवातर्फे सामुहिक नमाज पठण करण्यात आले देशात राष्ट्रीय एकात्मता कायम राहावी, जातीय सलोखा व शांतता नांदावी यासाठी विशेष 'दुवा' मागण्यात आली संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी प्रार्थना ही करण्यात आली. याप्रसंगी मौलाना इस्माईल रजा, मौलाना अन्वर रजा, मौलाना मुनाझीर, मौलाना जावीद, मौलाना मुस्ताक यांनी मुस्लिम बांधवांना सणाचे महत्त्व व उपस्थितांना नमाजपठणाची पद्धत समजवून सांगत नमाज पठण केले. यावेळी ओझर ,ओझरटाऊनशिप सह परिसरातील मुस्लिम बांधव त्यांच्या लहान मुलांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. रमजान ईदच्या निमिताने राजकीय नेतेमंडळींपासून ते सर्वसामान्य नागरिकांनी सहभागी होत मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या.उपस्थित समाजबांधवांनी एकमेकांना गळाभेट घेत हस्तांदोलन करत 'ईद'च्या शुभेच्छा दिल्या. . मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी ओझर नगर परिषद चे मुख्याधिकारी किरण देशमुख साहेब, यतीन कदम, माजी आमदार अनिल कदम, राजू शिंदे, प्रदिप आहिरे, धर्मा जाधव , हेमंत जाधव, राकेश जाधव, राहुल खाडे, श्रीकांत अक्कर , खंडेराव महाराज यात्रा कमिटी पदाधिकारी यांचेसह सामाजिकाणि राजकिय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते सामाजिक कार्यकर्ते विनोद विधाते यांच्या वतीने इदगाहमध्ये मंडप टाकून मुस्लिम बांधवांसाठी सावली करुन दिली नमाज पठण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उस्मान पठाण यांनी केले ओझर लिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी परि.उपाधिकक्षक अद्विता शिंदे , सहाय्यक पोलिस निरिक्षक तुषार गरुड ,हवालदार दीपक गुंजाळ, जितेंद्र बागुल,यांचेसह ओझर पोलीस स्टेशन कर्मचारी यांनी बंदोबस्त ठेवला होता

# दिव्य वार्ता

गुरुवार ०३ एप्रिल २०२५ | ४


## बीडच्या मांजरसुंबा घाटात भाविकांच्या जीपचा अपघात

### १४ प्रवासी गंभीर जखमी;जिल्हा रुग्णालयात उपचार

बीड । दिव्य न्युज

तुळजापूर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या क्रूझर जीपचा अपघात होऊन यामध्ये १४ प्रवासी गंभीर जखमी तर चार जण किरकोळ जखमी झाल्याची घटना मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास बीड- मांजरसुंबा रस्त्यावर मांजरसुंबा घाटाजवळ घडली आहे. यातील जखमींवर बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. आज सकाळी जखमींच्या नातेवाईकांनी सर्व जखमींना पुढील उपचारासाठी जालना येथे घेऊन गेले आहेत. जालना शहरातील भाविक क्रूझर जीपने तुळजापूर येथे दर्शनासाठी चालले होते. या जीपमध्ये एकूण १८ प्रवासी होते. दरम्यान ते धुळे-सोलापूर महामार्गावर बीड शहर पास करुन काही अंतरावर गेले असता चालकाचे नियंत्रण सुटून जीप सरळ दुभाजकावर जाऊन धडकली व पलटी झाली. अपघात घडताच प्रवाश्यांना थांबून अपघातग्रस्तांना मदत केली. या सर्व जखमींना बीड येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. एकाच वेळी १४ रुग्ण आल्याने डॉक्टर, कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली मात्र सर्व रुग्णांवर उपचार करण्यात आले. सर्वाधिक जखमींच्या डोक्याला मार लागलेला असून, काहींना तर १४ टाके घ्यावे लागले अशी माहिती उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिली. पण सुदैवाने यात कोणाच्याही मेंदूला मार नव्हता यामुळे सर्व रुग्णांची प्रकृती चांगली आहे. अपघाताची माहिती नातेवाईकांना देताच त्यांनी बीड येथे येऊन सर्व जखमींना पुढील उपचारासाठी जालना येथे घेऊन गेले. यातील जखमींची नावे आणि जीपचा क्रमांक समजू शकले नाही.



# आ.संदीप क्षीरसागरांच्या दूरदर्शी प्रयत्नाला यश

## बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधाऱ्याचा आ.क्षीरसागरांनी केला शुभारंभ

### बंधारा कम पुलामुळे बीड शहरासह परिसरातील गावांची भूजल पातळी वाढणार









### पूल कम बंधार्याचा सिंचन आणि पाणी साठवण्यासाठी मोठा फायदा

शुभारंभ झालेल्या बिंदुसरा नदीवरील पूल कम कोल्हापूरी बंधार्यामुळे बीड शहर आणि आजूबाजूच्या साधारण ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरात भूजल पातळीत वाढ होणार आहे. बीड जिल्ह्यात पावसाची अनियमितता असल्याने प्रत्येक उन्हाळ्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होते. परंतु या कोल्हापूरी बंधार्यामुळे पाणी साठवणूक होईल. परिणामी पाणी उपलब्धता आणि शेती सिंचनासाठी याचा खूप मोठा फायदा या पूल कम बंधार्याचा होणार आहे. बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल ही संकल्पना मोठी दूरदर्शी होती. ती आ.संदीप क्षीरसागर यांनी डोळ्यासमोर ठेवून हे काम होण्यासाठी निरंतर प्रयत्न केले. शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. अनेकवेळा अधिवेशनातही हा मुद्दा मांडला. दरम्यान आता आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नांना यश आले असून लवकरच हे काम पूर्ण झालेले असेल.

बीड । दिव्य न्युज

**बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या पात्रात पूल कम बंधारा बांधणीच्या कामाला अखेर सुरूवात झाली असून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.३) रोजी या कामाचा शुभारंभ केला. आ.क्षीरसागर हे काम होण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. या कामाची सुरूवात झाली असून लवकरच हे काम पूर्ण होणार आहे. या पूल कम कोल्हापुरी पद्धतीच्या बंधार्यामुळे बीड शहर आणि परिसरातील आसपासच्या गावांमध्ये भूजल पातळीत मोठी वाढ होणार आहे. ही आनंदाची बाब आहे.**

बीड शहरातील बार्शी नाक्याजवळील असलेल्या बिंदुसरा नदी पात्रात पूल कम कोल्हापूरी बंधारा तयार करावा. जेणेकरून बिंदुसरा नदीतून वाहून जाणारे पाणी अडविले जाईल. हे काम करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांनी गेल्या अनेक वर्षांपासून हा विषय लावून धरला. अशा स्वरुपातील हे काम असणार आहे. या कामाच्या मंजूरीसाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी अनेक वर्षे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. आणि अखेर आ.संदीप क्षीरसागरांच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले आहे. बिंदुसरा नदीवरील बंधार्यामुळे बीड परिसरात सिंचन आणि पाणी उपलब्धतेसाठी मोठा फायदा होणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांतून बीडसाठी अतिशय फायदेशीर असलेले हे काम लवकरच पूर्ण होणार आहे.

## बांधकाम कामगारांच्या अडचणी सोडविण्यासाठी अजितदादांना निवेदन-अलीम पटेल

बीड । दिव्य न्युज

महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगार मंडळाने ऑनलाईन सुविधेद्वारे कामगाराचे नोंदणी, नुतनीकरण विषयीचे अर्ज लवकर निकाली लावण्यासाठी निर्णय घेतलेला आहे व त्यासाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे अर्ज भरण्याची प्रक्रिया चालु करण्यात आलेली आहे. परंतु संदर ऑनलाईन पोर्टलवरील अर्ज भरण्यासाठी ऑफलाईन पेक्षाही जास्त कालावधी लागत असुन सदर अर्ज ऑनलाईन भरण्याकरिता खुप विलंब होत आहे. यासह इमारत बांधकाम कामगारांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या असंघटीत कामगार विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख अलीम पटेल यांनी निवेदन दिले.

ऑनलाईन साईटचा प्रॉबलेम, पोर्टलचा प्रॉब्लेम अशा अनेक अडचणींना कामगारांना तोंड द्यावे लागत आहे. हे ऑनलाईन अर्ज भरणेकरीता कामगार त्यांचा कामधंदा बुडवुन वारंवार ऑनलाईन पोर्टल केंद्रांवर चकरा मारतांना दिसुन येत आहेत व असे होऊनही कामकारांचे नोंदणी व नुतणीकरणाचे काम पुर्ण होत नाही असे आढळुन येत आहे. मयत कामगाराच्या वयोगटाची अट काढण्यात यावी. कामगार नाक्यावर शेड उभारण्यात यावे. बीड जिल्ह्यात ११ तालुके आहेत. तरी प्रत्येक तालूक्यासाठी एक या प्रमाणे ११ नोंदणी आधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावे. तालुका सुविधा केंद्र मध्ये दोन कर्मचारी वाळउन ते सात करण्यात यावेत. आचार संहितेमध्ये ३ महिन्याच्या कालावधीत कामगारांचे अर्ज भरता आले नाहीत ते तिन महिने वाढुन द्यावेत कारण लाभाचा अर्ज भरण्यासाठी एक वर्षाचीच मुदत आहे असा नियम आहे. त्यामुळे बरेच कामगार या लाभापासुन वंचीत राहीलेले आहेत. ग्रामसेवक शासनाचे आदेश असुनही कामगारांना ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी टाळाटाळ करत आहे त्यांना यासंबंधी आदेश निर्गमीत करण्यात यावेत. कामगारांचे रखडलेले लाभाचे अर्ज लवकरात लवकर निकाली लाऊन कामगारांना त्याचा लाभ देण्यात यावे. बांधकाम कामगारांना घरकुल योजनेअंतर्गत सहाय्यता मिळणेसाठी प्राधान्य देण्यात यावे. बीड जिल्हयातील महसुल विभागाकडुन गोदावरी नदीचे वाळुचा लिलाव बंद करण्यात आल्याने वाळुअभावी बरीच कामे बंद पडलेली असुन कामगारांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. तरी सदरील लिलाव करुन वाळु चालु करण्यात यावी आदी मागण्यांचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेसच्या असंघटीत कामगार विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख अलीम पटेल यांनी दिले.



## सादेक सिद्दीकींना दिली रमजान ईदची ईदी

### अल्पसंख्यांक विभागाच्या मराठवाडा सचिवपदी नियुक्ती केली



बीड । दिव्य न्युज

काल राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हयाच्या पालकमंत्री ना.अजितदादा पवार हे विविध कार्यक्रमा निमित्त दिवसभर बीड शहरात होते काल एका कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या आदेशावरन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र अल्पसंख्यांकचे कार्याध्यक्ष मोबीन सिद्दीकी यांनी सादेक सिद्दीकी, हमीदोद्दीन सिद्दीकी यांची मराठवाडा सचिवपदी अल्पसंख्यांक मोर्चा या पदावर नियुक्ती केली तसेच नियुक्तीचे पत्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र अल्पसंख्यांक विभागाचे कार्याध्यक्ष मोबीन सिद्दीकी राष्ट्रवादीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेक्ष क्षीरसागर, शेख निजाम यांची उपस्थिती होती सादेक सिद्दीकी यांची या पदावर निवड झाल्याबद्दल सर्वस्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून अनेकांनी त्यांना निवड झाल्याबद्दल शुभेच्छा ही दिली आहे.

हमीद सिद्दीकी हे राष्ट्रवादी काँग्रेसचे जुने कार्यकर्ते असून डॉ.भारतभुषण क्षीरसारगर व डॉ.योगेश क्षीरसागर यांचे कट्टर समर्थक आहे पक्षाशी असलेली ईमानदारी आणि पक्षाचा काम ईमान एतेबारे करत असल्यामुळे अजितदादा पवार यांनी त्यांच्यावर आता मराठवाडयाची जबाबदारी दिली आहे.

## ना.अजितदादांच्या बैठकीत आ.क्षीरसागरांनी मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न मांडले

### प्रशासनाशी संबंधीत आणि विकासाचे मुद्दे केले उपस्थित





बीड । दिव्य न्युज

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली विविध विकास कामांची तसेच शासकीय योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (दि.२) रोजी पार पडली. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील म. हत्वाचे प्रश्न ना. अजित दादांसमोर मांडले. यासोबतच प्रशासनाच्या संबंधित असलेले अनेक मुद्दे आ.क्षीरसागर यांनी उपस्थित केले. बीड जिल्ह्यातील विकास कामे व शासकीय योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठकबुधवारी (दि.२) रोजी ना. अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत ना. अजितदादांनी जिल्ह्यात पूर्ण झालेल्या आणि सुरू असलेल्या विकासकामांचा तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. याप्रसंगी बीडविधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी या नात्याने आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसं महत्वाचे असलेले अनेक प्रश्न मंत्री महोदयांसमोर मांडले. टुकूर साठवण तलावाऐवजी कोल्हापुरी बंधार्यांसाठी केली आग्रही मागणी खाडेपारगाव येथील मंजूर टुकूर साठवण तलावाच्य ऐवजी बीड तालुक्यात प्रस्तावित ठिकाणी नऊ कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांना प्रशासकीय मान्यता मिळावी यासाठी आ. संदीप क्षीरसागर गेल्या अनेक काळापासून शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत.

बीड येथे पालकमंत्री ना. अजितदादा पवार आले असता यावेळीही याबाबत आ. संदीप क्षीरसागर यांनी या भागातील नागरिकांसह आग्रही मागणी केली. यावेळी परिसरातील सर्व ग्रामस्थ मंडळीच्या प्रतिनिधींसह आ.क्षीरसागरांनी ना. अजित दादांना याबाबत निवेदन दिले.

### आ. संदीप क्षीरसागर यांनी मांडलेले मुद्दे...

एमआयडीसी भागात पोलीस चौकी उभारणी करणे.

नरेगा अंतर्गत जी अनावश्यक कामे झाली आहेत त्यातील कुशलची कामे प्रमाणात झालेली नाहीत. अनावश्यक मागणी केल्याने आज रोजी जी कामे आवश्यक आहेत ती करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ एफ खरवंडी ते नवगण राजुरी रस्त्यावरील मौजे नवगण राजुरी, काटवटवाडी येथील संपादित प्रकरणात सुधारित निवाडा व निधी मागणी.

खरवंडी-ब्रह्मनाथ येळंब-आर्वी-खालापुरी-नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ एफ ची सुधारणा करण्याबाबतचे काम गेल्या सात वर्षांपासून अपुर्ण आहे.

बीड शहरातील जालना रोड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक नाली बांधकाम करण्याबाबत मागणी केली. त्यास मा. मंत्री महोदयांनी सकारात्मकता दर्शविली. बीड नगर परिषद ने ओपन स्पेसच्या जागा अनियमितता करून बोगस वाटप केले आहेत. गुंठेवारी बोगस केलेली आहे. नगर परिषदेच्या फंडातून दुबार व निकृष्ट दर्जाची अनेक कामे केलेली आहेत. या सर्व प्रकरणातील मुळ संचीका नगर परिषद, बीड येथून गायब आहेत. तसेच नगरपरिषद प्रशासन बीड शहरातील स्वच्छता व पाणी पुरवठ्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.

## अंगाची हळद निघण्याआधीच नवदाम्पत्याची आत्महत्या

### बीड तालुक्यातील केतुरा गावातील हृदयद्रावक घटना



बीड । दिव्य न्युज

अवघ्या दीड महिन्या पूर्वीच लग्न झालेल्या नवदाम्पत्याच्या अंगाची अजून हळदही निघाली नसणार मात्र या नवदाम्पत्याने राहात्या घरातच दोघांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना आज सकाळी केतुरा (ता.बीड) येथे उघडकीस आली. दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले होते. या घटनेने हळहळ व्यक्त केली जात आहे. अक्षय हरीभाऊ गालफाडे ( वय २६ वर्ष), शुभांगी अक्षय गालफाडे (वय २१ वर्ष) दोघे रा. केतुरा असे आत्महत्या केलेल्या नवदाम्पत्याची नावे आहेत. प्रत्येक तरुण-तरुणीचे लग्न आणि त्यानंतरच्या आयुष्यातील स्वप्न असतात. तसे या दाम्पत्याचे स्वप्न असतील पण लग्न होऊन अवघा दीड महिना झाला असताना त्यांनी टोकाचं पाऊल उचलले आणि अंगाची हळद निघण्याच्या आधी त्यांनी आयुष्य संपविले आहे. दररोज लवकरच उटणारे दोघेही पहाटे लवकरच उठतात पण आज ७ वाजले तरी दोघेही पती-पत्नी कसे उठले नाही म्हणून पाहिले असता दोघेही गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले. कुटुंबातील व्यक्तींनी हंबरडा फोडला हे ऐकून शेजारी धावले. याची माहिती पोलिसांना दिली असता त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. दोन्ही मृतदेह बीड येथे जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले होते. सकाळी ११ वाजता या मृतदेहाचे शवविच्छेदन सुरू होते. ही घटना घरगुती किरकोळ वादातून घडल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०